१)प्रश्न- ग्रामपंचायतीकडून कोण कोणते दाखले दिले जातात ?

उत्तर -ग्रामपंचायतीमार्फत खालील महत्त्वाचे दाखले दिले जातात.

१)जन्म दाखला

२)मृत्यू दाखला

३)विवाह नोंदणी प्रमाणपत्र

४)नमुना ८ उतारा

५)ग्रामपंचायत येणे बाकी

६)दारिद्र्य रेषेखाली असलेचा दाखला

७)ग्रामपंचायत येणे बाकी दाखला.

२)प्रश्न- सदरचे दाखले मिळवण्यासाठी कोठे संपर्क करावा लागेल ?

उत्तर – आपले ग्रामपंचायत कार्यालयामध्ये संपर्क करून रीतसर अर्ज करून आपणाला हि सेवा मिळवता येईल.तसेच सदर सेवा मिळवण्यासाठी आपणाला महाराष्ट्र शासनाच्या https://aaplesarkar.mahaonline.gov.in/mr/Login या संकेत स्थळावर “वापरकर्ता नोंदणी” करून रीतसर अर्ज करता येईल.

३)प्रश्न- सदरचे दाखले मिळण्यासाठी किती दिवसाचा कालावधी लागेल?

उत्तर – सदर दाखले/सेवा उपलब्ध करून देण्यासाठी त्यासोबत लागणारे आवश्यक पुरावे जोडून रीतसर अर्ज दाखल केल्या नंतर शासनाने ठरवून दिलेल्या कालमर्यादेच्या आत म्हणजेच (किमान ५ दिवस ते कमाल २०दिवस ) या कालावधीत सदरच्या सेवा पुरविणे बंधनकारक करणेत आलेले आहे.

४)प्रश्न- जन्म,मृत्यू,विवाह नोंद केली नसेल तर असा दाखला मिळेल काय ?

उत्तर – “नाही”वरील सेवा मिळवताना जन्म, मृत्य, विवाह याची नोंद ग्रामपंचायती कडे झालेली असणे गरजेचे आहे .

५)प्रश्न- सदरचे दाखले मिळवण्यासाठी कोणती कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे?

उत्तर –वरील सेवा/दाखले मिळवताना कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत याबाबतचा तपशील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.ग्रामपंचायती मध्ये लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रांची सूची लावलेली पहावयास मिळेल.

६)प्रश्न- सदरच्या दाखल्यासाठी कीती शुल्क आकारले जाते ?

उत्तर – वरील सेवा/दाखले मध्ये दारिद्र्य रेषेखालील दाखला नि:शुल्क दिला जातो;उर्वरित सेवा मिळवण्यासाठी शासनाने विहित केलेले शुल्क आकारले जाते.

७)प्रश्न- सदर शुल्क कोठे भरावे ?

उत्तर –वरील सेवा/दाखले  आपणस “**ऑफलाईन**” हवी असलेस सेवा मागणी केलेल्या ग्रामपंचायती मध्ये रोख किंवा QR कोड वापरून भरू शकता तसेच सदर सेवा “आँनलाईन” पद्धतीने हवी असलेस सदरचे पोर्टलवर सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

८)प्रश्न- सदरचे दाखले मला कसे मिळतील ?

उत्तर –वरील सेवा/दाखले  आपणस “**ऑफलाईन**” हवी असलेस सेवा मागणी केलेल्या ग्रामपंचायती मध्ये दाखला प्राप्त करून घेता येतो. तसेच सदर सेवा “आँनलाईन” पद्धतीने मागितली असलेस  आपला दाखला आपण “**वापरकर्ता नोंदणी**” खाते मध्ये डाऊन लोड करून प्रिंट करून प्रत प्राप्त करून घेता येईल.

९) प्रश्न- सदरचे दाखले/सेवा ग्रामपंचायतीने देण्यास टाळाटाळ केली तर  मला कोठे तक्रार करावी लागेल?

उत्तर – या बाबत  आपणास प्रथम अपील “**प्रथम अपिलीय अधिकारी**” तथा “**सहाय्यक गटविकास अधिकारी**” पंचायत समिती व द्वितीय अपील “**द्वितीय अपिलीय अधिकारी**” तथा “**गटविकास अधिकारी**” पंचायत समिती यांचे कडे दाखल करता येईल.

१०) प्रश्न- सदरची सेवा न पुरविल्यास दंडाची तरतूद आहे काय ?

उत्तर :- कलम १० अन्वये पदनिर्देशित अधिका-याने पुरेशा व वाजवी कारणाशिवाय लोकसेवा देण्यात कसूर केली आहे असे प्रथम अपील

अधिकारी यांचे मत झाल्यास पदनिर्देशित अधिका-याला रु.५०० ते ५००० पर्यंत शास्ती करणेत येते.